जा.क्रं.नांवाशमनपा/निवडणुक/१५२-२०१७
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
दिनांक ०७.०९.२०१७

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका
## सार्वत्रिक निवडणूक २०१७
## जाहीर सुचना

मा.राज्य निवडणूक आयुक्त,राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र मुंबई यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०१७ साठी निवडणूक कार्यक्रम दिनांक ०६.०९.२०१७ अन्वये घोषित केलेला असून आज दिनांक ०६.०९.२०१७ पासून ते निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत म्हणजेच दिनांक १२.१०.२०१७ पर्यंत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे. निवडणूकी करीता निवडणूक विषयक पॉम्पलेट,पोस्टर्स छापणे,प्रकाशित करणे आदी बाबींसाठी सर्व मुद्रक,प्रकाशक व संबंधीत व्यक्तींना सुचित करण्यात येते की, राज्य निवडणुक आयोगाने भिंतीपत्रक व पोस्टर्स किंवा निवडणूक विषयक प्रचार साहित्य छापणे व प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध आदेश १९९५ नुसार खालील प्रमाणे निर्बंद घातलेले आहेत.

१. कोणत्याही इसमास निवडणूक विषयक पत्र,किंवा पोस्टर्स ज्यावर मुद्रक व प्रकाशक यांचे नाव व पत्ता टाकलेला नाही असे मजकुर छापता किंवा प्रकाशित करता येणार नाही.

२. कोणत्याही मुद्रकाने निवडणुक विषयक पत्रक किंवा पोस्टर्स ते प्रसिद्ध करणाऱ्या इसमाकडून त्याचे ओळखी बाबतचे, त्यांनी स्वाक्षरीत केलेले व प्रसिद्ध करणाऱ्या इसमाची ओळख मुद्रकास ज्ञान असलेल्या व्यक्तीने साक्षांकीत केलेले प्रतिज्ञापत्र दोन प्रतीत घेतल्याशिवाय छापता कामानये.

३. सदर मुद्रकाने छापण्यात आलेले पत्रक किंवा पोस्टर्सची एक प्रत प्रकाशकाचे प्रतिज्ञापत्राचे एक प्रतीसह वाजवी वेळेत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अथवा आयुक्त तथा निवडणुक अधिकारी,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका येथे दाखल केली पाहिजे.

वरील पैकी कोणत्याही तरतुदीचा भंग केल्यास दोषीव्यक्ती कायद्यातील तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाहीस पात्र ठरेल.

दिनांक : ०६.०९.२०१७
**ठिकाण : नांदेड**

स्वा/-
**आयुक्त तथा निवडणुक अधिकारी**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड**